
Keep
Silence
॥ पदवीदान समारं


राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पाथ्री
॥ पदवीदान समारंभ ॥




सकाळ

# राजर्षी शाहू महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

फुलंब्री, ता. २७ (बातमीदार) : पाथ्री (ता. फुलंब्री) येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ सोमवारी (ता. २७) झाला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष द्वारकादास पाथ्रीकर होते. आमदार अब्दुल सत्तार, आमदार सुभाष झांबड, माजी आमदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा परिषद सदस्य किशोर बलांडे, बाजार समितीचे सभापती संदीप बोरसे, संस्थेच्या सचिव उषाताई पाथ्रीकर, सहसचिव वरुणभैय्या पाथ्रीकर, फोस्टर डेव्हलपमेंट महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुपमा पाथ्रीकर यांची प्रमुख



पाथ्री (ता. फुलंब्री) : राजर्षी शाहू महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र देताना संस्थेच्या सचिव उषाताई पाथ्रीकर व पदाधिकारी.

उपस्थिती होती. आमदार चव्हाण म्हणाले, "ग्रामीण विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संगणक विषयात सक्षम बनावे. कौशल्य विकासाचे शिक्षण घेऊन, स्वतःच्या पायावर उभे राहावे." द्वारकादास पाथ्रीकर यांनी उद्योजक होण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. प्राचार्य डॉ. सतीश जाधव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सत्तार, झांबड, डॉ. काळे यांचीही भाषणे झाली.

डॉ. रश्मी पाथ्रीकर, रेखा मेश्राम यांनी सूत्रसंचालन केले. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. सचिन मोरे, डॉ. कैलास इंगळे, डॉ. सुरेश अलोणे, डॉ. रवी जाधव, डॉ. युवराज गहेराव, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. महेंद्र शेलार, प्रवीण बेरड, समाधान दाभाडे, प्रा. पवन काळे, डॉ. श्यामसुंदर, डॉ. दत्ता फुके, डॉ. शिवाजी उबरहंडे, डॉ. कांबळे, दीपक दानवे, बाबासाहेब गायके यांनी प्रयत्न केले.

Aurangabad, District-Today
28/08/2018 Page No. 7

नवनाथ इधाटे : तालुका बातमीदार दै.सकाळ फुलंब्री


GPS Map Camera
Dongargaon Kawad, Maharashtra, India
Unnamed Road, Dongargaon Kawad, Maharashtra 431111, India
Lat 20.116113°
Long 75.476015°
04/01/22 01:57 PM
Google


GPS Map Camera
Dongargaon Kawad, Maharashtra, India
Unnamed Road, Dongargaon Kawad, Maharashtra 431111, India
Lat 20.116113°
Long 75.476015°
04/01/22 01:58 PM
Google


GPS Map Camera
Dongargaon Kawad, Maharashtra, India
Unnamed Road, Dongargaon Kawad, Maharashtra 431111, India
Lat 20.116113°
Long 75.476015°
04/01/22 01:57 PM
Google






शिक्षण संस्था संचलित
कै. स्वा.सै. रामराव पा. माध्यमिक विद्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित

मित्र साधना शिक्षण प्रसारक मंडळ पाथ्री संचलित

राजर्षी शाहू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री, ता.फुलंब्री जि. औरंगाबाद,

**महाविद्यालय आले आपल्या दारी उपक्रम**

**अहवाल** दि. २१.०७.२०२२


राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद. महाविद्यालयाच्या वतीने **'महाविद्यालय आले आपल्या दारी' उपक्रम** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी घेण्यात आला. हा उपक्रम घेण्यामागे एक महत्त्वाचा उद्देश्य आहे. राजर्षी शाहू महाविद्यालय हे ग्रामीण भागात आहे. तरूण पीढीची शिक्षणाविषयीची उदासिनता मधल्या काळांत थांबली असली तरीही बदलत्या राजकीय व आर्थिक वातावरणात ती अजुनही मोठयाप्रमाणात उदासिन होत जाताना दिसते. त्यांमुळे त्यांच्यातील शिक्षणाविषयीचे समज गैरसमज, विद्यार्थी आणि पालक यांच्या अडचणी जाणून घेवून त्यांचे पाल्य शिक्षणापासून वंचित राहू नये. यांसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

गेल्या दिड दोन वर्षा पासून करोना १९ या महामारीमुळे जगातील सर्व देशाप्रमाणेच भारत सरकारनेही सक्तीचे बंद अमलांत आणले. या लॉक डाऊनच्या काळांत अनेक घडामोडी घडल्या. ऑन लाईन शिक्षण व्यवस्था होतीच परंतु प्रत्येक विद्यार्थ्याची आर्थिक परिस्थिती ही निटनेटकी नाही. नैसर्गिक आणि मानवनिर्मीत सर्व संकटांना त्यांना नेहमीच सामोरे जावे लागते. आर्थिक स्थितीची अस्थिरता हा त्यांच्या समोर नेहमीच पडलेला प्रश्न आहे. त्यामुळे इतर क्षेत्रांप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्राचेही फार मोठे नुकसान झाले आहे. आर्थिक परिस्थिती आणि इंटरनेट असुविधा यांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणांत पाहिजे तेवढी प्रगती झाली नाही. ऑफ लाईन शिक्षण सुरू होवूनही पाहिजे तेवढा प्रतिसाद शिक्षणासंदर्भात विद्यार्थी पालकांचा नाही,बहुतांश विद्यार्थी आणि पालक या संदर्भात उदासीन दिसून येतात.

संबंधित कारणांच्या अनुषंगाने नियोजित गावांच्या भेटी घेवून तेथील पालकांसोबत आणि विद्यार्थ्यांसोबत चर्चा करणे आवश्यक होते. यां सोबतच आधुनिक काळांतील नवतंत्रज्ञान, शिक्षणाच्या नवशाखा, स्पर्धा परीक्षेची माहिती, नवनवीन योजना त्यांच्या पर्यंत पोहोचावी. तसेच विद्यार्थी हा शिक्षण प्रवाहाकडे कसा येईल, त्याच्या शिक्षणाची आणि भविष्याची चिंता जाणून महाविद्यायांतील **'महाविद्यालय आले आपल्या दारी'** या उपक्रमाअंतर्गत उपक्रमांतील समीतीने पाल, निधोना,आडगाव(बु) या गावांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात आले.

'महाविद्यालय आले आपल्या दारी' समीतीचे अध्यक्ष प्रा. किरण धनेधर, सदस्य डॉ.रेखा मेश्राम, सोबतच महाविद्यालयातील सहा.प्रा.ज्ञानेश्वर पाथ्रीकर, डॉ. कंटुले नियोजित गावांच्या भेटीसाठी दि.२६. ६.२०२२ या दिवशी पोहोचलो.

पाल, निधोना, आडगाव(बु) या गावांतील पालक, विद्यार्थी, गावांतील प्रतिष्ठीत नागरीक, यांना समीतीने भेटी दिल्या. त्यांसोबतच गावांतील शाळांनाही समीतीने भेट दिली. गावातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संदर्भात संबंधित शालेय शिक्षकांचे सहकार्य लाभले. तसेच गावकरी, पालक, विद्यार्थी आणि गावांतील प्रतिष्ठीत नागरीक यांना गावभेटीचे प्रयोजन सांगण्यात आले. त्यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. त्यांच्या अनेक प्रश्नांना समाधानकारक उत्तरेही देण्यात आली. आश्वासित होत समीती महाविद्यालयात दाखल झाली.













महाविद्यालय आले आपल्या दारी उपक्रम समीतीचा गावभेटीचा फोटोसहित अहवाल आपणाकडे सुपूर्त करत आहे स्वीकार व्हावा ही विनंती

समीती अध्यक्ष

प्रा.किरण धनेधर
महाविद्यालय आले आपल्या दारी उपक्रम

Rajarshi Shahu Arts, Commerce & Science College, Pathri

Tq-Phulambri Dist-Aurangabad.

# Mahavidyalaya Aale Aplya Dari

पुढारी

## विद्यार्थ्यांची रेशीम शेती केंद्रास भेट

**फुलंब्री:** 'महाविद्यालय आपल्या दारी'' या उपक्रमांतर्गत डोंगरगाव कवाड येथील विजय डकले यांच्या रेशीम शेतीच्या संगोपन केंद्रास पाथ्री येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी मंगळवारी (दि. १२) भेट दिली.या कार्यक्रमास प्राचार्य डॉ.सतीश जाधव, उपक्रम समन्वयक प्रा.किरण धनेधर, प्रा.रेखा मेश्राम, प्रा.ज्ञानेश्वर पाथ्रीकर, प्रा.राज पोपळघट, डॉ.दीपक गायकवाड, डॉ.तुकाराम कांबळे, डॉ.किशोर वाघ व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. यावेळी डकले म्हणाले, रेशिम शेतीचा सगळीकडे प्रसार व्हावा आणि आत्महत्येच्या दारातील शेतकरी वाचावा. कारण शेतकऱ्यांसाठी एक शेतकरी म्हणून जेव्हा विचार येतो तेव्हा आजच्या समस्या डोळ्यांसमोर दिसतात. या समस्यांच्या जाळ्यात शेतकरीच अडलेला दिसतो. म्हणून शेतकरी नात्याने मनात आहे की, प्रत्येक शेतकरी रेशिम शेतकरी व्हावा आणि देशाची प्रगती व्हावी, असेही ते म्हणाले.

दैनिक दिव्य मराठी
13-Feb-2019
औरंगाबाद जिल्हा Page 5

# महाविद्यालय आले आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत संगोपन केंद्रास भेट

प्रतिनिधी । फुलंब्री

महाविद्यालय आले आपल्या दारी या अभिनव उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील पाथ्री राजर्षी शाहू महाविद्यालयाने आज मंगळवार दि.१२ रोजी डोंगरगाव कवाड येथील विजय डकले यांच्या रेशीम शेतीचा विश्वजीत चॉकी किटक संगोपन केंद्रास भेट दिली.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.सतीश जाधव उपक्रम समन्वयक, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा.किरण धनेधर, प्रा.रेखा मेश्राम, प्रा.ज्ञानेश्वर पाथ्रीकर, प्रा.राज पोपळघट, डॉ.दिपक गायकवाड, डॉ.तुकाराम कांबळे, डॉ.किशोर वाघ व मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी केंद्राचे संचालक विजय डकले यांनी रेशीम शेती विषयक व्यवसाय सुरू करण्यापासून ते आजपर्यंत अनुभवलेल्या व केलेल्या कार्याची सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. ते पुढे बोलताना म्हणाले की, रेशीमशेती फक्त शेतीच नसून शिक्षणाची संधी आहे. प्रत्येक मुलाने जर रेशीमशेतीचा अभ्यास करून शेतीमध्ये हा व्यवसाय केला तर कुठल्याही नोकरी पेक्षा कमी नाही कारण जेवढी मेहनत आपण नोकरीसाठी करतो तेवढी मेहनत या व्यवसायात केली तर यश तुमच्या हातात आहे.खरं म्हणजे आता एकत्र स्वप्न आहे की या रेशिम शेतीचा सगळीकडे प्रसार व्हावा आणि आत्महत्येच्या दारातील शेतकरी वाचवा कारण शेतक-यासाठी एक शेतकरी म्हणून जेव्हा विचार येतो तेव्हा आजच्या समस्या डोळ्यासमोर दिसतात. या समस्यांच्या जाळ्यात शेतकरीच अडलेला दिसतो. म्हणून शेतकरी नात्याने मनात आहे की, प्रत्येक शेतकरी रेशिम शेतकरी व्हावा आणि देशाची प्रगती व्हावी कारण भारत कृषीप्रधान देश आहे. प्राचार्य डॉ.सतीश जाधव यांनी विजय डकले यांच्या रेशीम शेती विषयी प्रशंसा करून विद्यार्थ्यांनी व शेतकरी बांधवांनी शेतात असे नाविन्यपूर्ण उपक्रम व मेहनत घेतली तर कोणत्याही शेतकरी बांधवांस आत्महत्या करण्याची गरज पडणार नाही असे सांगितले. विद्यार्थ्यांनी या शेती व्यवसायातून प्रेरणा घेऊन आपापल्या शेतात असे प्रयोग व मेहनत सातत्याने करावे असे आवाहन केले. रेशीम शेतीमुळे नापिकीच्या संकटातून आत्महत्या करणारा शेतकरी लाखो रूपयांचे उत्पन्न काढत आहे. प्रा.रेखा मेश्राम यांनी प्रास्ताविक केले तर प्रा.किरण धनेधर यांनी आभार मांडले.

सकाळ » TODAY
औरंगाबाद
सकाळ

# डोंगरगाव कवाड येथे रेशीम शेतीची पाहणी

फुलंब्री, ता. १३ (बातमीदार) : पाथ्री (ता. फुलंब्री) येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालय आपल्या दारी या उपक्रमांतर्गत डोंगरगाव कवाड येथील रेशीम शेतीच्या विश्वजित चॉकी कीटक संगोपन केंद्रास विद्यार्थ्यांनी मंगळवारी (ता. १२) भेट दिली.

याप्रसंगी केंद्राचे संचालक विजय डकले यांनी रेशीम शेतीविषयक व्यवसायाचा अनुभव व कार्याची प्राध्यापक व विद्यार्थ्यांना माहिती दिली. श्री. डकले म्हणाले की, रेशीम शेती फक्त शेतीच नसून शिक्षणाची संधी आहे. प्रत्येक मुलाने जर रेशीम शेतीचा अभ्यास करून शेतीमध्ये हा व्यवसाय केला तर कुठल्याही




**डोंगरगाव कवाड (ता. फुलंब्री) : रेशीम शेतीच्या केंद्राला भेट देताना प्राचार्य डॉ. सतीश जाधव, प्रा. ज्ञानेश्वर पाथ्रीकर, प्रा. किरण धनेधर, प्रा. रेखा मेश्राम आदी.**

नोकरीपेक्षा कमी नाही. कारण जेवढी मेहनत आपण नोकरीसाठी करतो तेवढी मेहनत या व्यवसायात केली तर यश तुमच्या हातात आहे. यावेळी प्राचार्य डॉ. सतीश जाधव, उपक्रम समन्वयक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. किरण धनेधर, प्रा. रेखा मेश्राम, प्रा. ज्ञानेश्वर पाथ्रीकर, प्रा. राज पोपळघट, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. तुकाराम कांबळे, डॉ. किशोर वाघ यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. रेखा मेश्राम यांनी महाविद्यालय आले आपल्या दारी या उपक्रमाविषयीची पार्श्वभूमी व प्रास्ताविक केले.

समन्वयक प्रा. किरण धनेधर यांनी आभार मानले.

Aurangabad, District-Today
14/02/2019 Page No. 8

नवनाथ इधाटे : तालुका बातमीदार दै. सकाळ फुलंब्री

महाराष्ट्र टाइम्स

# रेशीम शेतीस भेट

फुलंब्री : 'महाविद्यालय आले आपल्या दारी' या उपक्रमात तालुक्यातील डोंगरगाव कवाड येथील विश्वजीत चॉकी कीटक संगोपन केंद्राला विद्यार्थी, शिक्षकांनी भेट दिली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सतीश जाधव, उपक्रम समन्वयक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. किरण धनेधर, प्रा. रेखा मेश्राम, प्रा. ज्ञानेश्वर पाथ्रीकर, प्रा. राज पोपळघट, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. तुकाराम कांबळे, डॉ. किशोर वाघ आदींची उपस्थित होती. केंद्र संचालक विजय डकले यांनी रेशीम शेतीबद्दलचा अनुभव सांगितला. प्राचार्य डॉ. जाधव यांनी डकले यांची प्रशंसा करत असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याची गरज प्रतिपादन केली.


राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पाथ्री
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.
“ महाविद्यालय आले आपल्या दारी ”


राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पाथ्री
ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.
“ महाविद्यालय आले आपल्या दारी ”















